**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २५/१०/२०११

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.८ शनिवार दि. २९/१०/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**शनिवार दिनांक- २९/१०/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५१ | अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे केंद्र संचालक म्हणून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना मा.स्थायी समिती सभेचे मंजूरी नुसार रूपये १५,०००/- चे मानधनावर दिनांक २८/२/२०११ पासून सहामहिने कालावधी करिता कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा दिनांक १/११/२०११ पासून जास्तीत एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली बाबत सध्याचे जकात अभिकर्ता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मुदतवाढ देणे विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ५३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी सन २०११-१२ या वर्षाकरिता संयुक्त जकात वसुलीचा वार्षिक करार रूपये १.२९ कोटी चा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत**- विषय-क्रमांक- ५१ ते ५३ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८**

विषय क्रमांक-५१ शनिवार दिनांक २९/१०/२०११

ठराव क्रमांक -५१ शनिवार दिनांक २९/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे केंद्र संचालक म्हणून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना मा.स्थायी समिती सभेचे मंजूरी नुसार रूपये १५,०००/- चे मानधनावर दिनांक २८/२/२०११ पासून सहामहिने कालावधी करिता कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अ.नगर म.न.पा. आस्थापना जा.क्र. वर्क-७० दिनांक १८/१०/२०११
विषय- स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची संचालक म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक करणे बाबत.

मा. स्थायी समिती सभा क्रमांक २ विषय क्रमांक १६ दिनांक १६/८/२०११ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणुन श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची दि.२५/२/२०११ अखेर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुक केलेली असुन त्यांना दरमहा मानधन रूपये १०,०००/- ऐवजी दरमहा रूपये १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) मानधन देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार व प्रसिध्दी अधिकारी यांचा अभिप्राय व मा.स्थायी समिती सभा क्रमांक २ विषय क्र.१६ दि.१६/८/२०११ अन्वये श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना रूपये १०,०००/- ऐवजी दरमहा रूपये १५,०००/- मानधन देण्याबाबत पारित झालेल्या ठरावानुसार त्यांना दि.२८/२/२०११ पासून सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणे बाबतचा मुळ प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि. १८/१०/२०११
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे संचालक म्हणून श्री. मिसाळ सर यांची रू. १५०००/- चे मानधनावर दिनांक २८/२/२०११ पासून सहामहिने कालावधी साठी मुदतवाढ देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- श्री. मिसाळ सर यांचे मानधन वाढविणेचा विषय आताच मंजूर केलेला आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- मा. सभेने मानधन वाढविले आहे. त्याच वाढीव मानधनावर त्यांना मुदतवाढ देणे आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.गंधे सु.मे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे केंद्र संचालक म्हणून श्री.नारायण बाबुराव मिसाळ यांना मा.स्थायी समिती सभेचे मंजूरी नुसार रूपये १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त)चे मानधनावर दिनांक २८/२/२०११ पासून सहामहिने कालावधी करिता कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणेस मंजूरी देण्यात येत आहे. खर्च मंजूर. नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलिमा वसंतराव सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहिनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८**

विषय क्रमांक-५२ शनिवार दिनांक २९/१०/२०११

ठराव क्रमांक -५२ शनिवार दिनांक २९/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा दिनांक १/११/२०११ पासून जास्तीत एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली बाबत सध्याचे जकात अभिकर्ता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मुदतवाढ देणे विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अ.नगर म.न.पा. जकात विभाग दिनांक २१/१०/२०११

विषय : - दि. १.११.२०११ ते जकात अभिकर्ता नियुक्ती होईपर्यंत. या कालावधीसाठी जकात व पारगमन शुल्क वसुली बाबत.

सविनय सादर ,

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेने सन २०११ - १२ या कालावधीकरीता जकात व पारगमन शुल्क वसुली करणेकामी जकात अभिकर्ता नियुक्ती बाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६ दिनांक ७/९/२०११अन्वये किमान देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- व यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी / नाटयगृह बांधणे / महापौर निवास बांधकाम या करीता रक्कम रू.२ कोटी निश्चित करून अहमदनगर महानगरपालिका हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेकामी सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापुर्वी कमीत कमी मुदतीची जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून शासन परिपत्रकानुसार निविदा मागविण्यांत मान्यता देण्यात येत आहे अशाबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे, सदर ठरावानुसार दि.८/९/२०११ ते ७/१०/२०११ या तीस दिवसांची जाहिर निविदा प्रसिध्द केली होती.

प्रसिध्दीस दिलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार दि. ०७/१०/२०११ रोजी सकाळी ११.०० वा. मा.उपायुक्त यांचे दालनात जकात व पारगमन शुल्क चे ठेक्याकरीता प्राप्त निविदा उघडल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **देकार रक्कम रूपये** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | विपूल ऑक्ट्रॉय सेंटर | ८१.९९ कोटी | |
| २ | विक्रमादित्य सिक्युरिटी सर्व्हीसेस | ------- | अनुभवाचे प्रमाणपत्र दिलेले नसल्याने अपात्र |
| ३ | सोलापूर कंन्स्ट्रक्शन अँण्ड फॅब्रिकेशन प्रा.लि. | ९०.११ कोटी | |
| ४ | ओंकारा कंन्स्ट्रक्शन | ७४.५१ कोटी | |
| ५ | सहकार ग्लोबल प्रा.लि. | ६४.०८ कोटी | |

वरीलप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रू.६०,९६,१५,०००/- यापेक्षा मे. सोलापूर कंन्स्ट्रक्शन & फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची रक्कम रू.९०.११ कोटी इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त देकार रक्कमेची प्राप्त झालेली आहे.

तरी वरीलप्रमाणे सन २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीस्तव निविदा प्रक्रियेमध्ये मे. सोलापूर कन्स्ट्रक्शन & फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची निविदा मंजुर करून त्यांची जकात अभिकर्ता नेमणुक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची २ प्रकरण ८ मधील कलम ३५ नुसार मा. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर केला असता, मा.स्थायी समिती ठराव क्र.५० अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली कामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कमे पेक्षा तुलनात्मक दृष्टया जास्तीचे निविदा धारक मे.सोलापूर कंन्स्ट्रक्शन ॲण्ड फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची रूपये ९०.११ कोटी (रूपये नव्वद कोटी आकरा लाख फक्त) इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त असल्याने मंजूर करण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

मात्र मे. सोलापुर कन्स्ट्रक्शन & फॅब्रीकेशन प्रा.लि. यांनी दि.१५/१०/२०११ रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेस पत्र देउन त्यांनी जकात निविदा प्रक्रियेमध्ये निविदा फॉर्म भरताना चुकीची गणणा व अती उत्साहाचे भरात देकार रक्कम भरण्यात आल्याने निविदा प्रक्रियेत आमच्या निविदेचा विचार करण्यात येउ नये. तसेच आम्ही निविदेसोबत भरलेली इसारा रक्कम परत करावी अशाबाबत विनंती केलेली आहे. निविदा प्रक्रियेत मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर, मुंबई यांची देकार रक्कम रू.८१.९९कोटीची निविदा दुस-या क्रमांकाची प्राप्त झालेली असल्याने त्यांनी दि.१८/१०/२०११ रोजी महानगरपालिकेकडेस विनंती अर्ज देउन सदर निविदेचा विचार करावा अशाबाबत कळविले आहे, परंतु मा. शासन परिपत्रक क्र. जकात २०११/प्र.क्र.११ /नवि ३४, मंत्रालय, मुंबई दि.१९/४/२०११ च्या निर्देशातील मुद्दा क्र. २(१२) नुसार -यशस्वी अभिकर्ता ८(आठ) दिवसात बँक गॅरेटी देउ शकला नाही आणि बँक गॅरेंटी देण्यासाठी त्याने मुदत मागीतल्यास त्याच्याकडुन वार्षीक देकार रक्कमेच्या १० टक्के रक्कम रोख भरून घेउन त्यास जास्तीत जास्त १ महिन्यापर्यत जकात वसुल करण्याचा अधिकार देण्याबाबत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा. या एका महिन्याच्या विहीत मुदतीत बँक गॅरेंटी न दिल्यास सदर भरणा अग्रीम रक्कम जप्त करण्यात यावी, कोणत्याही परिस्थितीत अशी व्यवस्था एक महिन्याच्या कालावधी पेक्षा जास्त कालावधीसाठी चालु ठेवण्यात येउ नये. काही कारणास्तव सर्वात जास्त रक्कमेची निविदा दाखल करणारा ठेकेदार जकात / पारगमन शुल्क वसुलीचे काम स्विकारण्यास तयार नसल्यास किंवा त्यांने विहित सुरक्षा ठेवीसाठी बँक गॅरेटी देण्यास नकार दिल्यास त्यानी भरलेली इसारा रक्कम (earnest money) जप्त करण्यात यावी व फेर निविदा काढण्यात यावी अशाबाबत निर्देश असल्याने अहमदनगर महानगरपालिकेने सदर निविदेचा विचार केलेला नाही.

तसेच मा. शासनाच्या निर्देशातील मुद्दा क्र. २ (१०) नुसार फेर निविदा काढताना निविदेचा कालावधी हा १५ दिवसांपर्यंत कमी करता येईल अशाबाबत निर्देश देण्यांत आलेले आहेत.

मा. शासनाच्या निर्देशानुसार फेर निविदा काढणे बंधनकारक आहे मात्र फेर निविदा काढताना स्थानिक परिस्थीतीचा विचार करता ईसारा रक्कम १० लाख ऐवजी २ कोटी निश्चित करण्यात येउन त्यानुसार दि.२०/१०/२०११ रोजी जकात व पारगमन शुल्क वसुलीकरीता अभिकर्ता नेमणेकामी दि.२०/१०/२०११ ते ५/११/२०११ या १५ दिवसांचे कालावधीची जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमणेकामी ची फेर निविदा प्रक्रिया ही दि.५/११/२०११ पर्यंत चालु राहाणार असुन सध्याचे जकात अभिकर्ता यांचे जकात ठेक्याची मुदत दि.३१/१०/२०११ रोजी रात्री १२ वा. संपते आहे. सबब सन २०११-१२ करीता चे निविदा प्रक्रियेमध्ये नवीन अभिकर्ता नेमणुक होईपर्यत दि.१/११/२०११ पासून पुढील कालावधीसाठी जकात व पारगमन शुल्कची वसुली बाबत निर्णय होणे अत्यावश्यक आहे.

महानगरपालिकेने २०१०-११मध्ये जकात अभिकर्त्याशी जकातीचा करारनामा करताना मा.शासनाच्या निर्देशान्वये अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ बाबत खालील प्रमाणे करारमान्यात अटीचा समावेश केलेला आहे.

Due to election code of conduct, it may not have been possible for the Municipal Corporation to announce the revised Octroi-rates for the year २०१०-११ if for this reason or any other reason, the Municipal Corporation feel that they may not be able to finalise all the formalities for appointment of octroi agent before contract ending date so fixed, the Municipal Corporation in their discretion may complete the formalities within specific period after this date and tender agency for next year. They may, for this purpose only, further in their/discretion extend the period of contract of the existing agency by specific period., if he is agreeing or themselves under take Octroi collection through their own staff for specific period. It is not compulsory that for this purpose, the period of existing contract should be extended and the agent also cannot have any right of extension. If the Municipal Corporation chooses, in its discretion to itself undertake octroi collection during the period.

तसेच मा.शासनाने दि.१९/४/२०११ रोजी दिलेल्या परिपत्रकातील मुद्दा क्र.४ (I) नुसार- करारनाम्याचा कालावधी हा कोणत्याही परिस्थित एक वर्षा पेक्षा जास्त असु नये , अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये उदा. निवडणुकीची आचार संहिता, नैसर्गीक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे हा कालावधी वाढविण्याची गरज भासल्यास व संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी वाढ सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने अनुज्ञेय राहील. अशाबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच दि.०१/११/२०११ते जकात अभिकर्ता नियुक्त होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त १महिना यात जो कमी कालावधी असेल या कालावधी करीता जकात अभिकर्त्यास मुदतवाढ द्यावयाची झाल्यास सध्याचे जकात अभिकर्ता यांचे जकात ठेक्यास महानगरपालिकेने मागील वर्षात निश्चित केलेली देकार रक्कम रू.५४.५५कोटी याचा साप्ताहीक हप्ता रक्कम रू.१,०९,१०,०००/- यामध्ये मा.शासनाचे निर्द्वेशानुसार १५टक्के वाढ करून त्यानुसार येणारी

साप्ताहीक हप्त्याची रक्कम रू.१,२५,४६,५००/- साप्ताहीक हप्ता रक्कम निश्चित करून व त्यास संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी मुदतवाढ देता येईल अशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची ड मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मागील अटी व शर्तीस अधीन राहुन मुदतवाढ देता येईल.

तरी सन २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमणुक होईपर्यंत म्हणजे दि.०१/११/२०११ पासून जकात व पारगमन शुल्क वसुली सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना उक्त कालावधीसाठी मुदतवाढ द्यावी याबाबत निर्णयास्तव सक्षम प्राधिकरण म्हणून मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यांस आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे. दि. २१/१०/२०११

मुख्य लेखा परिक्षक :- **"अ"** प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर. दि.२५/१०/२०११

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे पाठवा. दि.२५/१०/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-महानगरपालिका हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत म्हणजे दिनांक १/११/२०११ पासून जास्तीत जास्त एक महिन्यासाठी सध्याचे जकात अभिकर्ता यांना जकात वसुली कामी मुदतवाढ देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- जकात निविदा दाखल करावयाची शेवटची तारीख काय आहे

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- दिनांक ५/११/२०११ अशी शेवटची तारीख आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- सध्याची जकात ठेकेदार मुदतवाढ घेण्यास नाही म्हणाला तर काय करणार

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- जकात वसुली आपले मार्फत करावी लागेल.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मागील वेळी प्रस्तावामध्ये जकात वसुली मनपा कर्मचा-यामार्फत करणे किंवा मुदतवाढ देणे बाबत उल्लेख केलेला होता आता केलेला नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- मागील वेळी दिवाळीचे कालावधी साठी आपण एक महिन्याची मुदतवाढ दिली होती. त्यानुसार आताही मुदतवाढ देणे विषयी प्रस्ताव दिलेला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील वेळी दोन नंबर चे निविदा धारक विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांनी पत्र देउन जकात वसुली ठेका घेण्यास संम्मती दर्शविली होती. मा. शासनाचे परिपत्रकानुसार मुदतवाढ देता येत होती तरी ही त्याचा विचार प्रशासनाने केला नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- मा. शासन परिपत्रकानुसार फेरनिविदा मागविल्या आहेत.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मुदतवाढ घेण्यास जकात अभिकर्ता यांनी नकार दिल्यास आपण काय करणार

मा.श्री.सातपुते दि. ना. :- परिपत्रक म्हणजे जी.आर. नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :-मा. शासनाचे परिपत्रक म्हणजे जी.आर.चा च भाग असतो. पूर्वी मनपा कर्मचा-यामार्फत जकात वसुल करणे किंवा मुदतवाढ देणे या दोनही पर्यायाचा उल्लेख प्रस्तावामध्ये केलेला होता. दिवाळीचे सिझनमध्ये सध्याचे जकात अभिकर्ता यंना एक महिन्याची मुदतवाढ दिलेली असल्याने आता मुदतवाढ देणे बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. मुदतवाढ घेण्यास सध्याचे जकात अभिकर्त्याने नकार दिल्यास जकात वसुली मनपा कर्मचा-यामार्फत करावी लागेल.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- स्थायी समितीची मान्यता न घेता फेर निविदा मागविल्या आहेत. आता निविदा कुणी भरली नाही तर पुढे काय ?

मा.उपायुक्त(सा.)श्री.डोईफोडे साहेबः-मा.शासनाचे सन२०११चे परिपत्रकानुसार फेरनिविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. मा.शासनाचे परिपत्रकामधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली आहे. मा. शासनाचे परिपत्रका विरूध्द प्रस्ताव देता येत नाही किंवा मा. शासनास तसे कळविता येत नाही.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- जकात निविदा प्रक्रियेत जर जकात ठेका रक्कम कमी आली तर काय ? त्याची जबाबदारी कुणाची

मा.श्री. सातपुते दि.ना. :- निविदा अनामत रूपये दोन कोटी ठेवली आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- स्थानिक परिस्थितीनुसार बयाना रक्कम वाढविता येते.

मा.श्री.डागवाले कि.आ./मा.श्री. लोंढे सु.सो.:- विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांनी दिलेले पत्र सभेमध्ये वाचून दाखवावे.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांचे दिनांक १८/१०/२०११ रोजी मा.आयुक्त साहेब यांना दिलेले पत्र वाचून दाखवितो.

महोदय,

वरील विषयान्वये विनंती अर्ज करतो की, आम्ही अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ च्या जकात व पारगमन शुल्क वसुलीच्या ठेक्याकरीता विपुल ऑक्ट्राय सेंटर मुंबई या नांवे निविदा सादर केलेली आहे. सदर निविदा प्रक्रियेत सोलापुर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची सर्वात जास्त रक्कमेची निविदा आलेली आहे. मात्र सदर संस्थेने जकातीचा ठेका घेण्यास असमर्थ असल्याबाबत महानगरपालिकेस पत्राने कळविले आहे.

आमची निविदा ही सदर संस्थेच्या देकार रक्कमेच्या खालोखाल म्हणजे रक्कम रूपये ८१.९९ कोटीची असुन आम्ही जकातीचा ठेका या देकार रक्कमेस घेण्यास तयार आहोत. तसेच सदरची देकार रक्कम ही अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कमेपेक्षा रक्कम रू.२१ कोटीने जास्त आहे. तरी आम्हांस सदर जकातीचा ठेका मिळावा. याप्रमाणे विपुल ऑक्ट्रॉय सेंटर यांचे पत्र असे.

मा. श्री. डागवाले कि.आ. :- या पत्रावर मा. शासनाचे मार्गदर्शन मागविणे आवश्यक होते. सदर पत्रावर प्रशासनाने प्रस्ताव सभेपुढे सादर केला असता तर सभेने निर्णय घेतला असता.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- मा. शासनाचे परिपत्रकानुसार कार्यवाही केलेली आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ./मा.श्री.लोंढे सु.सो.:- कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास त्यास स्थायी समिती जबाबदार राहणार नाही

मा.श्री. लोंढे सु.सो. :- सध्याचे जकात अभिकर्ता यांना एक महिन्या करीता मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे दिनांक १/११/२०११ पासून एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली कामी सध्याचे जकात अभिकर्ता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८**

विषय क्रमांक-५३ शनिवार दिनांक २९/१०/२०११

ठराव क्रमांक -५३ शनिवार दिनांक २९/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी सन २०११-१२ या वर्षाकरिता संयुक्त जकात वसुलीचा वार्षिक करार रूपये १.२९ कोटी चा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अ.नगर म.न.पा. जकात विभाग दिनांक १८/१०/२०११

विषय- अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी सन२०११-१२या वर्षाकरीता संयुक्त जकातीबाबतचे करारनाम्याबाबत.

सविनय सादर,

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांनी सन२०११-१२करीता अहमदनगर महानगरपालिकेशी संयुक्त जकात कर वसुलीबाबतचा करार करताना लोकसंख्येच्या आधारावर जकातीचे शेअर रक्कमेमध्ये रू.२९लाख ने वाढ करावी अशाबाबत पत्र क्र. ANR / RBT / T-1/ OCTROI / 2010-11 DI.04.03.2011,तसेच दि.१२/०५/२०११ चे पत्रान्वये कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-११ मध्ये कटक मंडळ, भिंगार, अहमदनगर चे हद्दीमधील चार जकात नाक्यामध्ये संयुक्त जकात कर वसुली बाबत मा. खास सभा ठराव क्र.२ दि.२०/२/२००६ अन्वये कटक मंडळ, अ.नगर यांस संयुक्त जकात कर वसुलीपोटी वार्षिक शेअर रक्कम रू.१ कोटी देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली असुन, तद्नंतर सन२०१०-११ या वर्षाचा संयुक्त जकातीचा करार करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१० अन्वये करारनामा करण्यास मान्यता प्राप्त झालेली असुन उक्त ठरावानुसार कटक मंडळास संयुक्त जकातीचे हिश्श्यापोटी प्रतीवर्षास रक्कम रू.१ कोटी देण्यास मान्यता देण्यात आलेली असुन त्यानुसार कटक मंडळास द.म. रक्कम रू.८,३३,३३३/- एवढी रक्कम जकातीची शेअर रक्कम म्हणुन देण्यात येत आहे. सदर कराराची मुदत ३१/३/२०११ रोजी संपलेली आहे.

कटक मंडळ, अहमदनगर यांनी दि.१२/५/२०११ चे पत्रान्वये- "छावणी परिषद क्षेत्रातुन नगर-सोलापुर रोड , नगर-जामखेड रोड हे दोन राज्यमार्ग व कल्याण- विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग जात असुन तीनही रस्त्यांवर अहमदनगर महानगरपालिकेचे जकात नाके आहेत. त्यामुळे या रस्त्यांवरून मिळणारे उत्पन्न महानगरपालिकेच्या इतर ठिकाणाहुन मिळणा-या उत्पन्नाच्या तुलनेत नक्कीच जास्त आहे. याबाबीचा महानगरपालिकेकडून विचार व्हावा, तसेच सन २००६-२००७ या वर्षी असणा-या वस्तुंच्या किंमतीत सन २०११-१२ मध्ये किमान ४०% तरी वाढ झालेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या जकातीच्या उत्पन्नात अनुक्रमे रू.३८ कोटीवरून रू.५४.०० कोटी म्हणजेच १६ कोटी ची वाढ झालेली आहे. यादृष्टीने विचार केल्यास महानगरपालिकेकडुन या कार्यालयास देण्यात येणारा जकातीचा हिस्सामध्ये वाढ करणे गरजेचे आहे.तरी सदरहू जकातीच्या हिस्सापोटी मिळणा-या रक्कमेत वाढ करण्यात यावी ही विनंती."अशाबाबत कळविलेले आहे.

कटक मंडळ अहमदनगर यांच्याशी सन २०११-१२ चा संयुक्त जकात कर वसुलीचा करारनामा करण्याबाबत व नविन वर्षामध्ये करारनामा करताना जकातीच्या शेअर रक्कमेत वाढ मिळावी अशाबाबत पत्राने वारंवार कळविल्याने प्रस्तुत बाबत दि.१९/९/२०११ रोजी कटक मंडळ,अ.नगर यांचेशी मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांच्या दालनामध्ये संयुक्त मिटींग आयोजित करण्यात आलेली असुन सदर मिटींग मधील कार्यवृत्त खालील प्रमाणे-

कार्यवृत्त- अहमदनगर महानगरपालिका व अहमदनगर कटक मंडळ (कॅन्टोन्मेंट बोर्ड ) या उभयतांचे कार्यक्षेत्रात संयुक्त जकात कर वसुलीबाबत व सन २०११-१२ या वर्षाकरीता मुदतवाढीचा करार करणेबाबत दि.१९/९/२०११ रोजी मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर यांचे कार्यालयामध्ये संयुक्त मिटींग झालेली असुन सदर मिटींगला खालील अधिकारी उपस्थित होते.

१] मा.श्री. संजय काकडे- आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका

२] मा.श्री महेश डोईफोडे- उपायुक्त (सा.), अहमदनगर महानगरपालिका

३] मा.श्री. एस.एस. शिरकुळ- अधिक्षक, कटक मंडळ भिंगार, अहमदनगर

४] मा.श्री. ए.डी. साबळे- प्र. जकात अधिक्षक, अहमदनगर महानगरपालिका

सदर मिटींग मध्ये मा.आयुक्त यांनी कटक मंडळ भिंगार,अहमदनगर यांचे कार्यालयामार्फत उपस्थित असलेल्या अधिका-यांस सन२०११-१२ करीता संयुक्त जकात वसुलीचे हिश्श्याचे रक्कम रूपये १.२९ कोटी या रक्कमेबाबत लोकसंख्या आधारीत प्रमाणाबाबतची माहिती देण्याविषयी विचारणा केली.

कटक मंडळ- याबाबत आपणांशी यापुर्वीच्या मिटींगमध्ये चर्चा झालेली आहे.

आयुक्त- लोकसंख्या वाढीचे प्रमाण कसे आहे ?

कटक मंडळ- सन १९९१ च्या जनगणने नंतर सन २०११ चे जनगणनेच्या आकडेवारीनुसार कटक मंडळ क्षेत्रातील लोकसंख्यावाढीचे प्रमाणे हे स्थलांतरामुळे कमी झालेले आहे.

आयुक्त- लोकसंख्या कमी झालेली आहे तर जकात हिस्सा रक्कम वाढवुन देण्याबाबत चे मागणीबाबत कोणते सुत्र अवलंबण्यात आले आहे.

कटक मंडळ- लोकसंख्येच्या आधारावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कटक मंडळ अहमदनगर यांनी जकात हिश्श्याची रक्कम निश्चित केलेली आहे.

आयुक्त- कटक मंडळाने कोणत्या तरी सुत्राने जकात हिश्श्याची रक्कम रू. १.२९ कोटी निश्चित केलेली असेल ना, याबाबत माहिती द्यावी.

कटक मंडळ- याबाबत सविस्तर माहिती लेखी स्वरूपात दिली आहे.

याबाबत कटक मंडळ भिंगार अहमदनगर यांचे कार्यालयाचे पत्र क्र० अह / आर.बी./ जकात /२०११-१२ अन्वये पुढील प्रमाणे माहिती दिलेली आहे.

उपरोक्त विषयाचे संदर्भात मा.आयुक्त साहेब यांचे दालनात व मा. उपायुक्त साहेब यांचे दालनात दि.१९/९/२०११रोजी आयोजित केलेल्या सभेत झालेल्या चर्चेनुसार या कार्यालयाने आपणांकडे जकात हिस्सामध्ये वाढ करणे बाबत दिलेल्या दि.२०/४/२०११ च्या पत्रावर चर्चा करण्यात आली, छावणी परिषद कार्यालयास प्राप्त पत्र क्र. १९ दि.४/५/२०११ हे बोर्डाच्या मासिक सभेत ठेवले असता.

बोर्डाने ठराव क्र.१२ दि.२३/५/२०११ रोजी मंजुर केलेल्या ठरावानुसार लोकसंख्येच्या आधाराऐवजी जकातीचा हिस्सा जकातीच्या उत्पन्नाच्या प्रमाणात मिळावा. याबाबत आपणांस दि.३०/५/२०११ च्या पत्रानुसार छावणी परिषदेने कळविले होते.

सन २००६-२००७ मध्ये अहमदनगर महानगरपालिकेस जकातीचे उत्पन्न रू. ४२ कोटी प्रतिवर्षी याप्रमाणे मिळत होते त्यावेळेस या कार्यालयास रू. १ कोटी जकात हिस्सा म्हणुन देण्यात आलेले होते. त्यानुसार आजमितीस अहमदनगर महानगरपालिकेस ५४ कोटी जकातीचे उत्पन्न मिळत आहे. त्यानुसार या कार्यालयास रू. १.२९ लाख एवढी रक्कम जकात हिस्सापोटी देण्यात यावी.

५४,००,००,०००/-
४२,००,००,०००/- x १,००,००,०००/- = १,२८,५७,१४२/- (रू. १,२९,००,०००/-)

वरीलप्रमाणे जकातीच्या उत्पन्नाच्या प्रमाणात जकात हिस्सा मिळणेबाबत आपणांस विनंती करण्यात येते आहे. त्यानुसार आपणांकडुन पुढील कार्यवाही होउन सन २०११-१२ चा करारनामा लवकरात लवकर तयार करण्यांत येउन मंजुरी द्यावी ही विनंती.

कटक मंडळ भिंगार अहमदनगर यांनी सन २०११-१२ करीता संयुक्त जकात वसुलीबाबत चे हिस्सा रक्कमेबाबत सादर केलेल्या वरील पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणी निर्णय सत्वर कळविण्यात येईल अशाबाबत सुचना देण्यात येउन सदरची मिटींग समाप्त झाली.

सदर मिटींग मध्ये सन २०११-१२ या कालावधीमध्ये कटक मंडळ अहमदनगर यांचेशी संयुक्त जकात कर वसुलीचा करार वार्षिक शेअर रक्कम रू. १.२९ कोटी देण्याविषयी सहमती दर्शक चर्चा झ ालेली आहे.

सन २०११-१२ या कालावधीत कटक मंडळ अ.नगर यांचेशी संयुक्त जकात वसुली चा करार करताना कटक मंडळ अ.नगर यांस जकातीच्या वार्षिक शेअर रक्कमेत वाढ करण्याबाबतचा विषय हा धोरणात्मक असल्याने प्रस्तुत प्रकरणी मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव पाठविणे अत्यावश्यक आहे.

तरी सदर बाबत पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे. दि.२०/१०/२०११

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- मुख्य कार्यकारी अधिकारी , कटक मंडळ यांच्या मागणीनुसार व संयुक्त बैठकीतील निर्णयानुसार कटक मंडळास जकात वसुलीपोटी रक्कम रू. १.२९ कोटी देणेबाबतचा अहवाल मुख्य लेखाधिकारी / मुख्य लेखापरिक्षक यांच्यामार्फत सादर. दि.२०/१०/२०११

मुख्य लेखाधिकारी / मुख्य लेखापरिक्षक :- उपरोक्त प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावानुसार सदरील विषय निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.२५/१०/२०११

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे पाठवा. दि.२५/१०/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी सन २०११-२०१२या वर्षाकरिता संयुक्त जकात वसुलीचा वार्षिक करार रूपये १.२९कोटीचा करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- या पुर्वी कॅन्टोन्मेंट बोर्डास जकात वसुली पोटी किती रक्कम आपण देत होतो.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- सन १९९५ ते १९९९ अखेर आपण कॅन्टोन्मेंट बोर्डाला संयुक्त जकात वसुली पोटी रूपये ५० लाख देत होतो. सन १९९९ मध्ये जकात बंद झाले नंतर सन २००५ पासून पुन्हा जकात चालु झाली तेव्हा पासून आपण कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी करार करून त्यांना रूपये एक कोटी दर वर्षी प्रमाणे देतो आहोत गेले पांच वर्षे त्यांनी रक्कम वाढवून मागतिलेली नाही. आता त्यांनी रूपये १ कोटी २९ लाख वार्षिक देणे बाबत मागणी केले नुसार त्यांचेशी विचार विनिमय करून बैठका घेउन रूपये १.२९ कोटीचा संयुक्त जकात वसुलीचा करार करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- आपला जकात ठेका कमी रक्कमेस गेला तर काय ?

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- आपण निश्चित केलेल्या देकार रकमेपेक्षा कमी रक्कमेस ठेका देणार नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी म.न.पा. हद्दीत संयुक्त जकात वसुली कामी पांच वर्षाचा करार करणेत यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- कॅन्टोन्मेंट बोर्डाची लोकसंख्या कमी होत आहे. त्यामुळे जकात वसुली ही कमी होते त्यामुळे लोकसंख्या किंवा जकात ठेका प्रमाणात त्यांना हिस्सा न देता वाटाघाटीद्वारे ठरविलेली रक्कम देणेबाबत.कॅन्टोन्मेंट बोर्डाशी पांच वर्षाचा करार करण्यांत यावा.सदर कालावधीमध्ये करार रक्कमेत वाढ देणार नाही असे ठरवावे.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- आपण जकात निविदा मागविता ना कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीसह जकात वसुली करणे बाबत कॅन्टोन्मेंटचा हिस्सा हिशोबामध्ये धरून त्याप्रमाणे देकार रक्कम निश्चित केलेली आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- आपण कॅन्टोन्मेंट बोर्डाशी करार न करता जकात वसुली केली तर त्याचे हद्दीमधील किती जकात नाके आपणास आपले हद्दीत घ्यावे लागतील.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- पांच नाके हलवावे लागतील.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीमध्ये संयुक्त जकात वसुली करतांना आपण पूर्वी त्यांना २००५ साली १ कोटी रूपये देत होतो त्या हिशोबा प्रमाणे त्याची टक्केवारी तीन टक्के प्रमाणे होती त्या टक्केवारी ने रक्कम ठरविल्यास ती साडे तीन कोटी होते आपले जकात उत्पन्न वाढले तरी आपण कॅन्टोन्मेंट बोर्डाला त्या प्रमाणात रक्कम वाढवून देत नाही कमीच रक्कम देतो आहोत.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. कॅन्टोन्मेंट बोर्डाशी पांच वर्षाचा संयुक्त करार करावा. त्याना सदर कालावधी संयुक्त जकात वसुली करार रकमेत वाढ देउ नये.

मा.सौ.गंधे सु.मे. :- पाचं वर्षाचा संयुक्त करार करावा. त्याना सदर कालावधी संयुक्त जकात वसुली करार रकमेत वाढ देउ नये. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे बरोबर सन २०११-२०१६ या कालावधी करिता जकात वसुलीचा संयुक्त करार वार्षिक रूपये १ कोटी २९ लाख या रकमेचा करण्यास सभेत झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. तसेच त्यांना सदर कालावधी मध्ये संयुक्त जकात वसुली करार रक्कम वाढवून देउ नये. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**<u>ठरावः-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेशी सन२०११-१२ या वर्षाकरिता संयुक्त जकात वसुलीचा वार्षिक करार रूपये १.२९कोटी चा करणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिका जकात ठेक्याच्या प्रमाणात किंवा लोकसंख्येच्या प्रमाणात कटक मंडळास हिस्सा न देता पुर्वीप्रमाणे वाटाघाटीद्वारे ठरविलेली रक्कम कटक मंडळास देण्यात यावी. कटक मंडळाशी झालेल्या संयुक्त बैठकीनुसार रक्कम रूपये १.२९ कोटी (रूपये एक कोटी एकोणतीस लाख फक्त) एवढी रक्कम कटक मंडळास देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.पुर्वीप्रमाणे सन २०११ ते २०१६ या ५(पांच)वर्षाकरीता ही रक्कम निश्चित करून करार करावा. तसेच त्यांना सदर कालावधी मध्ये संयुक्त जकात वसुलीचे वार्षिक करार रकमेत वाढ देणेत येउ नये ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलिमा वसंतराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहिनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका